# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २१ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२ मार्च, २०१७

प्रति,
आयुक्त,
चंद्रपूर, परभणी, लातूर, भिवंडी-निजामपूर,
मालेगाव व पनवेल महानगरपालिका.

विषय :- <u>६ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७</u>
मतदार यादी तयार करण्यासाठी कार्यक्रम सुधारीत करण्याबाबत.
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाची दि.८/३/२०१७ व
दि. १८/०३/२०१७ ची पत्रे.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन पत्रांन्वये मतदार यादी तयार करण्याकरिता कार्यक्रम देण्यात आलेला आहे. तथापि, काही महानगरपालिकांनी मतदान केंद्रांची यादी तसेच मतदान केंद्रनिहाय याद्या प्रसिध्द करण्याकरीता मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

२. त्यास अनुसरुन चंद्रपूर, परभणी व लातूर महानगरपालिकांकरिता संदर्भाधीन पत्रांन्वये देण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम अंशत: सुधारीत करुन टप्पा क्र. (ii), (iii) व (iv) मध्ये दिलेल्या तारखा पुढीलप्रमाणे सुधारुन देण्यात येत आहेत :-

| | | |
|---|---|---|
| ii) | प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्दीची सूचना देणे. | दि. २४/०३/२०१७ |
| iii) | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे. | दि. २५/३/२०१७ |
| iv) | प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि. २७/३/२०१७ |

वरीलपैकी ज्या महानगरपालिकांनी दि. २२/३/२०१७ रोजी मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द केली असेल, त्यांना पुन्हा मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करण्याची आवश्यकता नाही. तथापि, प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी त्यांनी दि. २७/३/२०१७ रोजी प्रसिध्द करावी.

२. तसेच भिवंडी-निजामपूर, मालेगाव व पनवेल या महानगरपालिकांकरिता संदर्भाधीन पत्रान्वये टप्पा क्र. (ii), (iii) व (iv) मध्ये दिलेल्या तारखा पुढीलप्रमाणे सुधारुन देण्यात येत आहेत:-

| | | |
|---|---|---|
| ii) | प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्दीची सूचना देणे. | दि. ०७/०४/२०१७ |
| iii) | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे. | दि. १२/०४/२०१७ |
| iv) | प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि. १८/०४/२०१७ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र